REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील पर्यावरण विषयक उपक्रमाचा अभ्यास

**शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर - कोंजारी**
**PHD पीएचडी संशोधिका, संशोधन केंद्र - शिक्षण शास्त्र महाविद्यालय बार्शी.**

## प्रस्तावना –



फार अनादिकाला पासून मानवाचा व पर्यावरणाचा संबंध ,. तरीही मानवाने केवळ स्वार्थापोटी निसर्गाचा वारेमाप वापर केला. त्यामुळे नैसर्गिकरित्या या घटकांना पुन्हा या पर्यावरणामध्ये स्थिर होण्याची क्षमता फारच कमी झालेली आहे. त्यामुळे अनेक पर्यावरणीय समस्या संकट निर्माण झाले आहे. पृथ्वीवर मानव हा प्राणी बुद्धिमान आणि तरबेज म्हणून संबोधला जातो. निसर्गात उपलब्ध होणाऱ्या विविध वस्तूंचा वापर मानवाने आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवत आल्या आहेत. याच गरजेपोटी त्याने पर्यावरणाचा अतिरेक वापर केला यातूनच पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या या दृष्टिकोनातून पर्यावरण शिक्षण इतर शालेय विषयातून कसे द्यावे लागेल याविषयी विचार प्रवाह पुढे आला यासंदर्भात कोणते कोणकोणते उपक्रम कृती कार्यक्रम घ्यावे यावर विचारमंथन सुरू झाले. या सर्वांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे. या पर्यावरणीय समस्येबाबत शिक्षकाची भूमिका, अध्यापन पद्धती, शालेय स्तर, सामाजिक स्तर आणि वैयक्तिक स्तरावर अनेक प्रकारचे उपक्रम घेता येतात परंतु या ठिकाणी केवळ वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील उपक्रमाबाबत विचार लक्षात घेण्यात आला आहे.

## १. पर्यावरण शिक्षणाच्या उपक्रमाचे स्वरूप

विद्यार्थ्याकरिता राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमापैकी हा एक उपक्रम आहे. यामधून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव जागृती उपक्रम उत्तम प्रकारे निर्माण करण्यासाठी हे उपक्रम उपयुक्त ठरतात. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभाग असणे अत्यंत महत्त्वाचे असते. मग कोणतेही उपक्रम असो उदाहरणार्थ दिन महात्म्य आणि पर्यावरणविषयक उपक्रम, सामाजिक उपक्रम, वैयक्तिक उपक्रम आणि इतर उपक्रम यांचा समावेश असेल अशा उपक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या आवारातील झाडाचे निरीक्षण क्रिडांगणाभोवतली वृक्षारोपण करणे, शालेय परिसर स्वच्छ ठेवणे, झाडांना आळी करून पाणी घालणे, पर्यावरण मानवाचा असणारा परस्परसंबंध चित्रातून दर्शवणे, पर्यावरणाचे महत्व या विषयावर तज्ञाचे व्याख्यान आयोजित करणे. पर्यावरणातील काही दुर्मिळ गोष्टीविषयी माहिती फलकावर लिहिणे. पर्यावरण विषयक वक्तृत्व

स्पर्धा आयोजित करणे, विद्यार्थ्यांचे निरीक्षण शक्ती वाढविणे, पर्यावरणासंबंधित लेख संग्रहण करणे व त्याचे फलकावर दर्शन करणे, गावागावातून पर्यावरण विषयक दिंड्या काढणे, झाडे लावा झाडे जगवा हा मंत्र घरोघरी पोहोचविणे, गावातील परिसर स्वच्छ करणे, पिण्याच्या टाकी, हौद स्वच्छ करणे, जागतिक लोकसंख्या दिन साजरा करणे, लोकसंख्यावाढ व अज्ञान या विषयी पथनाट्य सादर करणे, बॉम्बस्फोटाचे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाची माहिती देणे. लढाईच्या दुष्परिणामाचे परिणाम याविषयी वर्तमानपत्रात आलेले लेखांचे संग्रहण करणे मानवनिर्मिते पर्यावरणीय समस्या कशा निर्माण होतात याची उदाहरणे देणे व जाणीव जागृती घडवून आणणे. पर्यावरण विषयक स्लाईड-शो आयोजित करणे औद्योगिकरणाचे पर्यावरणावरील परिणाम दर्शवणाऱ्या चित्राचे प्रदर्शन घडवून आणणे. वनस्पती आच्छादनांचे महत्व पटवून देणे यासारख्या विविध उपक्रमाचे आयोजन करणे म्हणजे निसर्गाच्या मनावर पर्यावरणाचे महत्व, गरज, उपयुक्त आणि स्वरूप स्पष्ट करता येते.

## २. वैयक्तिक स्तरावरील उपक्रम

विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात तेथील परिसर आणि सभोवतालच्या ठिकाण पर्यावरणीय दृष्टीने अनुकूल करता येते याविषयीचे त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. यावर आधारित उपक्रमाचे आयोजन पुढीलप्रमाणे करता येईल.

१. घर आणि घरालगतचा परिसर स्वच्छ ठेवणे.
२. घराच्या परिसरात शोभेची फुलझाडे लावणे.
३. घराच्या सभोवताली वृक्षारोपण करणे.
४. विविध वृक्ष - पाने संग्रहित करणे त्यातून वृक्षाचे महत्व समजून घेणे.
५. घरातील सर्व सदस्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे.
६. घरातील सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे.
७. घराच्या आजूबाजूच्या झाडांची पाने, फुले, फळे पडलेली असतात ती खड्डु यात टाकावे
८. घराच्या परिसरात वापरलेले तन मुळासकट उपटून टाकणे.
९. कारगिल युद्धाची विविध चित्रे संग्रहित करणे.
१०. पर्यावरणाविषयी माहिती सांगणारे लेख प्रकाशित करणे.
११. शिक्षकांनी स्वतः एखादा छंद जोपासणे.
१२. शिक्षकांच्या निरीक्षणातून प्राप्त माहिती काचफलकामध्ये लावणे.
१३. पर्यावरण विषयक लेख, चित्र माहितीचे संग्रहण करणे.
१४. वन्य पशु – पक्षी, प्राणी यांचे निरीक्षण करून नोंदी ठेवणे.
१५. सभोवतालच्या परिसरातील पक्षांचे निरीक्षण करणे.
१६. पाळीव प्राण्यांची पर्यावरणातील उपयुक्तता समजून घेणे.
१७. ताई प्राण्यांच्या मलमूत्राची विल्हेवाट योग्य प्रकारे लावणे.
१८. अन्नधान्याची काळजी कशी घ्यावी याचा संग्रहित लेख ठेवावेत.
१९. पिण्याच्या पाण्याचा वापरातील अतिरेक टाळावा.
२०. जंगलसंपत्तीचा साधनसंपत्ती म्हणून योग्य वापर करावा.

२१. देशातील मुख्य औद्योगिक क्षेत्राची माहिती संग्रहित करणे.

२२. घरातील धुम्रपान करणाऱ्या व्यक्तींना समजून सांगणे.

२३. स्वतः कशाचाही व्यसनाधीत न राहणे.

२४. शेती विषयी येणारे विविध लेख संग्रहित करणे.

२५. गावाजवळ शेतीचे निरीक्षण व नोंदी करणे.

२६. घराच्या आसपास योग्य झाडे लावणे.

२७. स्वच्छता विषयक नियम कटाक्षाने पाळणे.

२८. निसर्गोपचाराचा अवलंब करणे.

२९. अपारंपारिक ऊर्जा वापर याबाबत दक्ष राहणे.

३०. शेती विषयक वृत्तपत्रीय लेख संग्रहित करणे.

**२. सामाजिक स्तरावरील उपक्रम.**

सामाजिक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती परिसर याचा आढावा या उपक्रमांमध्ये घेण्यात आलेला आहे.

१. ग्रामस्वच्छतेचे कार्यक्रम घेणे.

२. सामाजिक ठिकाणी असणाऱ्या वृक्षांचे निरीक्षण करणे.

३. सार्वजनिक ठिकाणी एखादे पथनाट्य सादर करणे.

४. गावा गावातून शांतता फेरी काढणे.

५. गावातून वृक्षदिंडी काढणे

६. वृक्ष गावांमधील तलाव, चर्च, मंदिर, मस्जिद, रस्ते यांच्या सभोवताली वृक्षारोपण करण्याचा कार्यक्रम गावातील लोकांच्या सहाय्याने करणे.

७. सर्व गावकऱ्यांना पर्यावरणाच्या दृष्टीने शांततेचे महत्व पटवून देण्यासाठी गाव पातळीवर व्याख्यान आयोजित करणे.

८. वन्य प्राण्यांची माहिती पटवून देण्यासाठी गावातील प्रबोधन फेरीचे आयोजन करणे.

९. सामाजिक संस्थांच्या मदतीने वन्यप्राणी संरक्षणासाठी निधी जमा करणे.

१०. काटकसर आणि निसर्गाचा आधार असे घोषवाक्य घरोघरी पोहोचविणे.

११. गावातील सूचना फलकावरील युद्धांचे होणारे परिणाम लिहिणे.

१२. नैसर्गिक साधन संपत्तीचे काटकसर यावर पथनाट्य सादर करणे.

१३. औद्योगिक सुरक्षा का महत्त्वाच्या आहेत हे पटवून देण्यासाठी शहरातील औद्योगिक विभागातील एखादी शांतता फेरी आयोजित करणे.

१४. गावातील धूम्रपान विरोधी घोषवाक्यची फलक फेरी काढणे.

१५. एखादा पर्यावरण विषयक चित्रपट दाखविणे.

१६. एखाद्या लसीकरणाच्या कार्यक्रमात सहभागी होणे.

१७. पर्यावरण अभ्यास मंडळात मार्फत लोकांना पाणी, झाडे, वनस्पती याचा वापर कसा काटकसरीने करावा हे पटवून देणे.

समारोप

अशा प्रकारे पर्यावरणासंबंधी संदर्भात सामाजिक जाणीवजागृती करण्यासाठी स्थानिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि शालेय पातळीवर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे. पर्यावरण विषयक उपक्रम पार पाडताना पर्यावरण अभ्यास मंडळ व शिक्षकांनी पर्यावरण विषयक असणाऱ्या विविध सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यानुसारच गाव पातळीवर, कौटुंबिक पातळीवर, सामाजिक पातळीवर, शालेय पातळीवर व राष्ट्रीय स्तरावर जाणीव जागृती होणे महत्त्वाचे आहे.

## संदर्भसूची

१. पर्यावरण शिक्षण - एम भांडारकर
२. पर्यावरण शिक्षण - डी आर कुलकर्णी
३. पर्यावरण शिक्षण - तपकीर